# L. A. BILL No. XXXVII OF 2021.

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— १९५८ चा ६०.

(१) अनुच्छेद ६ मध्ये,—

(क) खंड (१) मधील, उप-खंड (ब) च्या, स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(ख) खंड (२) मधील, उप-खंड (ब) च्या स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(२) अनुच्छेद ३३ मधील, खंड (ब) च्या उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (दोन) जर याप्रमाणे कब्जा दिलेला नसेल तर,—

| | |
|---|---|
| (अ) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराची रक्कम पाच लाख रुपयापेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक आकाराच्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक आकाराच्या रकमेच्या ०.३ टक्के. " ; |

(३) अनुच्छेद ४० मधील, खंड (ब) मधील, उप-खंड (दोन) च्या स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी-योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(४) अनुच्छेद ४१ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

" **४१. पिकाचे गहाणखत,** एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर-मग गहाणाच्या वेळी पीक अस्तित्वात असो किंवा नसो,- दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही लेख यांसह,–

| | |
|---|---|
| (एक) अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के." ; |

(५) अनुच्छेद ५४ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

**"५४. प्रतिभूती - बंधपत्र किंवा गहाणखत,**

जेव्हा असे प्रतिभूती - बंधपत्र किंवा गहाणखत, एखाद्या पदाचे यथोचित कार्य करण्यासाठी प्रतिभूती म्हणून अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता अथवा एखाद्या कराराचे यथोचित पालन करण्याची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने अथवा न्यायालयाच्या किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या आदेशास अनुसरून निष्पादित करून दिलेले

१९५९ चा ३६.. असेल, परंतु महाराष्ट्र न्यायालय-शुल्क अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केलेले नसेल तेव्हा,—

| | |
|---|---|
| (एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के. :<br>परंतु, जेव्हा जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहते आणि प्रतिभूती बंधपत्र किंवा गहाणखत करून देते अशा व्यक्तीने निष्पादित केलेल्या लेखावर, अनुच्छेद ४० अन्वये शुल्क प्रदान करण्यात आले असेल तर, प्रदेय असलेले शुल्क शंभर रुपये इतके असेल.". |

## सूट

बंधपत्र किंवा अन्य लेख जेव्हा,—

(अ) धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे इतर कोणतेही उद्दिष्ट यासाठी खाजगी वर्गणीतून प्राप्त झालेले स्थानिक उत्पन्न, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी असणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही व्यक्तीने ;

(ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ अन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांन्वये; १९७६ चा महा. २८.

(क) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ यांअन्वये आगाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा आगाऊ रकमांच्या परतफेडीची प्रतिभूती म्हणून ; १८८३ चा १९. १८८४ चा १२.

(ड) एखाद्या पदाचे यथोचित कार्य करण्यासाठी किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्यासाठी प्रतिभूती म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी,

निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची एक मधील अनुच्छेद ६ खालील आकारणीयोग्य असलेल्या हक्क विलेखांच्या निक्षेपाद्वारे, गहाणाचा पुरावा असणाऱ्या लेखावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क हे, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ (२०२१ चा महा. ३) यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सुधारणा अधिनियम" असा केला आहे, याच्या प्रारंभाच्या पूर्वी, उक्त अनुसूचीच्या अनुच्छेद ४० खालील आकारणीयोग्य असलेल्या साध्या गहाणखतापेक्षा कमी होते. म्हणून, उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे, अनुक्रमे उक्त अनुच्छेद ६ व ४० खालील हक्क विलेखाच्या निक्षेपाद्वारे गहाणाच्या लेखावर आणि साध्या गहाणखतावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, एकरुप करण्यात आलेले आहे. उक्त सुधारणेमुळे झालेल्या महसुली तुटीचे समायोजन करण्यासाठी, उक्त अनुच्छेद ६ व ४० यामध्ये विनिर्दिष्ट केलेली दहा लाख रुपयांची कमाल मुद्रांक शुल्क मर्यादा, वीस लाख रुपयांपर्यंत वाढविणे गरजेचे आहे.

२. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण, गुजरात विरुद्ध कोस्टल गुजरात पॉवर लिमिटेड, (२०१५ चे दिवाणी अपील क्रमांक ६०५४) या प्रकरणामधील माननीय सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय विचारात घेता, अनेकविध संव्यवहारांचा समावेश असणाऱ्या किंवा त्याच्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही लेखाच्या बाबतीत, मुद्रांक शुल्क बसविण्याच्या दृष्टीने, उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ५ ची सुधारणा करण्यात आलेली आहे. कलम ५ च्या सुधारणेमुळे, बँकांच्या व्यापारी संघाच्या गहाणखताच्या लेखाच्या बाबतीत, प्रत्येक बँक, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बाबतीत, कमाल दहा लाख रुपयांच्या अधिनतेने, मुद्रांक शुल्क प्रदान करण्यास पात्र आहे. म्हणून, औद्योगिक व वाणिज्यिक क्षेत्राला आधार देता यावा आणि मुद्रांक शुल्काचे वेळेवर प्रदान करण्यास प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने, बँकांच्या व्यापारी संघांच्या नावाने निष्पादित केलेल्या गहाणाशी संबंधित असलेल्या लेखाच्या बाबतीत पन्नास लाख रुपयांची मुद्रांक शुल्काची कमाल मर्यादा विनिर्दिष्ट करणे शासनास इष्ट वाटते.

३. उक्त अधिनियमाखालील गहाणाच्या बाबतीत मुद्रांक शुल्क बसण्यामध्ये मेळ घालण्यासाठी, अनुच्छेद ३३ (गहाण मालमत्तेवरील अधिक प्रभार), अनुच्छेद ४१ (पिकाचे गहाणखत) आणि अनुच्छेद ५४ (प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत) यांसारख्या गहाणांच्या बाबतीत, अनुच्छेद ६ व ४० यांच्या विवक्षित आनुषंगिक अनुच्छेदांमध्ये सुधारणा करणे देखील शासनास इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **बाळासाहेब थोरात,**

दिनांक २० डिसेंबर, २०२१. महसूल मंत्री.

## वित्तीय ज्ञापन

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) या खालील गहाणखताच्या बाबतीत मुद्रांक शुल्क बसवण्यामध्ये मेळ घालण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या अनुसूची-एकमधील अनुच्छेद ६,३३,४०,४१ व ५४ यांमध्ये सुधारणा करण्याचे या विधेयकाच्या खंड २ मध्ये प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव असणारी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

**(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)**

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२१ पुर:स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

(शा.म.मु.) एचबी १७२९—२ (१०४५—१२-२०२१)

**सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक ३७–महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ यातील उतारे)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०)**

**१.** ते **७६.** ** ** ** **

**अनुसूची एक**

**संलेखांवरील मुद्रांक शुल्क**

(कलम ३ पहा)

| संलेखाचे वर्ण | उचित मुद्रांक शुल्क |
|---|---|
| (१) | (२) |
| **१.** ते **५.** ** ** ** | |
| **६.** हक्कविलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा, म्हणजे पुढील बाबीसंबंधीच्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख- | |
| (१) हक्कविलेख किंवा (विक्रेय प्रतिभूतिपत्राखेरीज इतर) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारा किंवा अशा हक्काचा पुरावा असणारा संलेख जेथे तो कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या स्वरूपात निक्षेपित केलेला असेल त्याबाबतीत असा हक्कविलेख किंवा संलेख निक्षेप म्हणून ठेवणे,— | |
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून ०.१ टक्के. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के. |
| (२) जंगम मालमत्तेचे हडप, तारण किंवा तारणगहाण, जेथे कर्जाच्या स्वरुपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या रुपाने असे हडप, तारण किंवा तारणगहाण करण्यात आले असेल अशा बाबतीत,— | |
| (अ) अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत करण्यात आलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर ; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रूपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून ०.१ टक्के. |
| (ब) अन्य कोणत्याही बाबतीत | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या, ०.३ टक्के. |

**स्पष्टीकरण एक–** हक्कविलेख निक्षेपासंबंधी कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात, अथवा कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या आदेशात अथवा त्यासंबंधीच्या कोणत्याही पत्रात, टिप्पणीत, ज्ञापनात किंवा लेखात-मग हक्कविलेख-निक्षेप अंमलात आला तेव्हा किंवा त्यानंतर किंवा त्यापूर्वी तो केलेला असो आणि पहिले कर्ज किंवा मागाहून घेतलेले अतिरिक्त कर्ज किंवा कर्जे यांच्या प्रतिभूतीसंबंधी असो-काहीही अंतर्भूत असले तरी, अशा हक्कविलेख-निपेक्षासंबंधी वेगळा करार किंवा करार संक्षेपलेख नसेल तेव्हा, असे पत्र, टिप्पणी, ज्ञापन किंवा लेख हे, या अनुच्छेदाच्या खंड (१) च्या प्रयोजनार्थ, हक्कविलेख-निक्षेपासंबंधातील कराराचा पुरावा म्हणून मानण्यात येईल.

" **स्पष्टीकरण दोन.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, अतिरिक्त कर्जासाठी किंवा पूर्वीच्या कर्जामध्ये वाढ करण्यासाठी निष्पादित केलेला कोणताही नवीन संलेख हा, नवा संलेख असल्याचे समजण्यात येईल आणि त्यावर प्रतिभूत केल्या जाणाऱ्या किंवा वितरित केल्या जाणाऱ्या किंवा मंजर केल्या जाणाऱ्या अतिरिक्त रकमेच्या मर्यादेपर्यंत शुल्क आकारणीयोग्य असेल.";

(३) ** ** **

**अनुच्छेद ७.** ते **३२.** ** ** **

**३३. अधिक प्रभार–** यासंबंधीचा संलेख म्हणजे, गहाण मालमत्तेवर अधिक प्रभार लादणारा कोणताही संलेख,—

(अ) ** ** **

(ब) जेव्हा असे गहाण हे, अनुच्छेद ४० खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या वर्णनाचे (म्हणजे कब्जाविना) असेल तेव्हा,—

(एक) ** ** **

(दोन) याप्रमाणे कब्जा देण्यात आला नसेल तर ;

अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेसाठी शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस आणि दहा लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून प्रत्येक पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक हजार रूपये.

**३४.** ते **३९.** ** ** **

| | |
|---|---|
| **४०. गहाणखत.—** हक्कलेख-निक्षेप, हडप किंवा तारण किंवा तारणगहाण (अनुच्छेद ६), नौतारण बंधपत्र (अनुच्छेद १४), पिकाचे गहाणखत (अनुच्छेद ४१), नौभर बंधपत्र (अनुच्छेद ५३), किंवा प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत (अनुच्छेद ५४) यासंबंधीचा करार वगळून अन्य,– | |
| (अ) ** ** ** | |
| (ब) जेव्हा उपरोक्तप्रमाणे कब्जा दिलेला नसेल किंवा देण्याचे कबूल केले नसेल तेव्हा; | |
| (एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रूपयांहून अधिक नसेल तर, | शंभर रूपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही प्रकरणी, | दहा लाख रूपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के. |
| **स्पष्टीकरण एक.—**जेवाह गहाणकार हा, गहाणधारकास गहाण मालमत्तेचे किंवा तिच्या भागाचे भाडे गोळा करण्याकरिता मुखत्यारनामा देतो किंवा भाडेपट्टा देतो तेव्हा, त्याने या अनुच्छेदाच्या अर्थांतर्गत कब्जा दिला असल्याचे मानले जाईल. | |
| **स्पष्टीकरण दोन.—**गहाण ठेवण्यासंबंधीच्या कराराच्या बाबतीत, अशा करारद्वारे प्रतिभूत करण्याचा हेतू असलेली रक्कम किंवा तिचा भाग गहाणखत निष्पादित करून न देता गहाणधारकाला आगाऊ देण्यात किंवा संवितरित करण्यात येईल त्याबाबतीत, कलम २ याच्या खंड (ड) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, गहाण ठेवण्यासंबंधीचा असा करार अशी रक्कम अशतः किंवा पूर्णतः आगाऊ दिल्याच्या किंवा संवितरित केल्याच्या दिनांकापासून गहाणखत म्हणून या अनुच्छेदान्वये शुल्क आकारणीस पात्र ठरेल. | |
| (क) ** ** ** | |
| **४१. एखाद्या पिकाचे गहाणखत.–** एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख यासह-मग गहाणाच्या वेळी असे पीक अस्तित्वात असो अगर नसो-प्रत्येकी २०० रूपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, | एक रूपया. |
| **४२** ते **५३.** ** ** ** | |
| **५४. प्रतिभूति-बंधपत्र किंवा गहाणखत.–** एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याकरिता प्रतिभूति म्हणून, अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता निष्पादित | दहा लाख रूपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.५ टक्के ; |

केलेले अथवा एखाद्या कराराच्या रीतसर पालनाची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने निष्पादित करून दिलेले अथवा न्यायालयाच्या किंवा लोक अधिकाऱ्याच्या आदेशास अनुसरून निष्पादित कूरून दिलेले, परंतु मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ द्वारे अन्यथा तरतूद न केलेले :–

**माफी**

बंधपत्र किंवा अन्य संलेख जेव्हा,—

(अ) धर्मार्थ दवाखाना, रूग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे इतर कोणतेही उद्दिष्ट यांसाठी देण्यात येणाऱ्या खाजगी अंशदानातून होणारे स्थानिक उत्पन्न, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने;

(ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ अन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार,

(क) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४ यांन्वये कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा कर्जाऊ रकमांच्या परतफेडीबद्दलची प्रतिभूति म्हणून;

(ड) एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा योग्य हिशेब देण्याबद्दल प्रतिभूति म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी;

निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा.

परंतु जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहिली आहे किंवा तिने प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत करून दिलेले आहे अशा एखाद्या व्यक्तीकडून करण्यात आलेल्या एखाद्या संलेखावर अनुच्छेद ४० अन्वये शुल्क भरले असेल त्याबाबतीत, शंभर रूपये एवढे शुल्क देय असेल.

**५५.** ते **६२.** ** ** **

**अनुसूची दोन** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.]**

**[महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई